# अर्जाचा नमुना

( वसई विरार शहर महानगरपालिका ...... ....... ....... ........ ............ .या पदासाठी अर्ज )

| उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५ से.मी) आकाराचा फोटो चिटकवून स्वतः साक्षांकीत करावा |
|---|

प्रति,
मा. आयुक्त सो.
वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
विरार पूर्व,ता.वसई,जि.ठाणे,पिन ४०१ ३०५.

संपुर्ण नांव मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

| संपूर्ण नांव | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|
| १) आडनांव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| २) स्वतःचे नांव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ३) वडिलांचे/पतीचे नांव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |
| ४) आईचे नांव : | ---------------------------------------- | ---------------------------------------- |

२) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :

(पिन कोडसहित) ..........................................................

..........................................................

संपर्कासाठी दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ..........................

३) अ) जन्मतारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि. १/०६ २०१३ रोजीचे वय

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

४) खाली नमूद केलेल्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये ✓ अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला | माजी सैनिक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

५) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी व श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

६) अनुभव-

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

७)अवगत असणा-या भाषा (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

८ आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ? (असल्यास थोडक्यात तपशील द्यावा)

| होय | नाही |
|---|---|
| | |

९) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१

२

३

४

१०) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

११) अर्जदार महाराष्ट्राचा आधिवासी आहे काय ? : होय / नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही--------------------

(..........................)

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना

**प्रतिज्ञापन (विवाहीत उमेदवारासाठी)**

नमुना-अ

(नियम ४ पाहा)

मी श्री. श्रीमती कु. ........................ श्री ..............................

याचा/ याची/ मुलगा/ मुलगी/ पत्नी, वय .............. वर्षे, राहणार .................................................. याद्वारे पुढीलप्र माणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी .............................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला .......... इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ...... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही/-

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार

विरार पूर्व, ता.वसई, जि.ठाणे,पिन ४०१ ३०५.

जावक क्र.वविशम/आस्था/ २१/२०१६-१७ | दिनांक : ०५/०४/२०१६

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागातील खालील संवर्गातील पदे भरणेकरीता त्यासाठी दर्शाविलेली पात्रता व अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज दिनांक १०/५/२०१६ पर्यंत मागविण्यांत येत आहेत.सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळ www.vvmc.in वर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | पदनाम आणि वेतनश्रेणी ( प बँड व ग्रेड पे र.रु.) | पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनु. जा.ती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र. | इ.मा. व. | खुला |
| १ | अग्नीशमन केंद्र अधिकारी | ०२ | सर्व साधारण आरक्षण | - | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | एकुण | - | १ | - | - | - | - | - | - | १ |
| २ | उप-अग्नीशमन केंद्र अधिकारी | ०४ | सर्व साधारण आरक्षण | १ | १ | - | - | - | - | - | - | २ |
| | | | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | एकुण | १ | १ | - | - | - | - | - | - | २ |
| ३ | अग्निशमन विमोचक | १८ | सर्व साधारण आरक्षण | १ | ३ | १ | - | १ | - | - | २ | ८ |
| | | | माजी सैनिक | - | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | एकुण | १ | ४ | १ | - | १ | - | - | २ | ९ |
| ४ | चालक - यंत्रचालक | १३ | सर्व साधारण आरक्षण | १ | ३ | - | १ | | - | - | १ | ६ |
| | | | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | एकुण | १ | ३ | - | १ | | - | - | १ | ७ |

| पदाचा सांकेतांक क्रमांक | पदाचे नांव | कमाल वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता व किमान शारिरीक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | अग्नीशमन केंद्र अधिकारी वेतन श्रेणी रुपये ९३००-३४८०० ग्रेड पे- ४३०० (६ व्या वेतन आयोगाप्रमाणे) | ४० वर्षे पेक्षा जास्त असु नये. | नामनिर्देश :<br>अ) शैक्षणिक पात्रता :<br>१. कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा स्टेशन ऑफिसर अँण्ड इन्स्ट्रक्ट्रर पाठ्यक्रम ( अग्निशमन अभियांत्रिकी मधील पदविका) उत्तीर्ण असावा.<br>किंवा<br>महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.<br>किंवा<br>दि इन्स्टीटयुट ऑफ फायर इंजिनिअर्स ( यु.के) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड-आय पदवी प्राप्त केलेली असावी. | शासकीय / निमशासकीय संस्थामधील अग्निशमन सेवेतील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी ( रु.९,३००-३४,८००, ग्रेड वेतन रु.४,२०० अथवा शासनमान्य वेतनश्रेणी ) या पदावर किमान ५ वर्षे किंवा उप अग्निशमन केंद्र अधिकारी ( रु.५,२००-२०,२००, ग्रेड वेतन रु.२,८०० अथवा शासनमान्य वेतनश्रेणी) या पदावर किमान ७ वर्षे कार्य केल्याचा अनुभव असावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ३. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक<br>( लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>४. एम.एस.सी.-आय.टी परीक्षा पास असावा.<br><br>किमान शारिरीक पात्रता:<br>(अ) उंची - १६५ से.मी.<br>(ब) छाती - साधारण ८१ सेमी.<br>फुगवून ५ सेमी जास्त<br>(क) वजन - ५० कि.ग्रॅ.<br>(ड) दृष्टी - चांगली. | |
| २. | उप-अग्नीशमन केंद्र अधिकारी ५२००-२०२०० ग्रेड पे- २८०० ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे | ३५ वर्षे पेक्षा जास्त असु नये | नामनिर्देश :<br>अ) शैक्षणिक पात्रता :<br>१. कोणत्याही मान्यताप्राप्त शाखेचा पदवीधर असावा.<br>- राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा उप अग्निशमन अधिकारी हा पाठयक्रम पुर्ण केलेला असावा.<br>किंवा<br>महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.<br>किंवा<br>दि इन्स्टीटयुट ऑफ फायर इंजिनिअर्स ( यु.के) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड-आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक<br>( लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>४. एम.एस.सी.-आय.टी परीक्षा पास असावा.<br><br>किमान शारिरीक पात्रता:<br>(अ) उंची - १६५ से.मी.<br>(ब) छाती - साधारण ८१ सेमी.<br>फुगवून ५ सेमी जास्त<br>(क) वजन - ५० कि.ग्रॅ.<br>(ड) दृष्टी - चांगली. | शासकिय/निमशासकिय संस्थामधिल अग्निशमन सेवेतील प्रमुख अग्निशमन विमोचक किंवा चालक-यंत्रचालक या पदावर किमान ५ वर्षे कार्यकेल्याचा अनुभव असावा. |
| ३. | अग्निशमन विमोचक ५२००-२०२०० ग्रेड पे- १९०० | २५ वर्षे पेक्षा जास्त नसावे. | नामनिर्देश :<br>अ) शैक्षणिक पात्रता :<br>१. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा.<br>३. एम.एस.सी.-आय.टी. परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>४. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br><br>किमान शारिरीक पात्रता:<br>(अ) उंची - १६५ से.मी.<br>(ब) छाती - साधारण ८१ सेमी.<br>फुगवून ५ सेमी जास्त<br>(क) वजन - ५० कि.ग्रॅ.<br>(ड) दृष्टी - चांगली. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | चालक -<br>यत्रचालक<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे- २००० | ३०वर्षे पेक्षा जास्त नसावे. | **नामनिर्देश :**<br>अ) शैक्षणिक पात्रता :<br>१. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. जड वाहनचालक म्हणुन ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>३. वैद्य जड वाहन चालविण्याचा परवाना.<br>४. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br><br>किमान शारिरीक पात्रता:<br>(अ) उंची - १६५ से.मी.<br>(ब) छाती - साधारण ८१ सेमी.<br>फुगवुन ५ सेमी जास्त<br>(क) वजन - ५० कि.ग्रॅ.<br>(ड) दृष्टी - चांगली. | |

१. वयोमर्यादा :-अ) अग्निशमन केंद्र अधिकारी या पदासाठी शासकिय अथवा **निमशासकिय सेवेमध्ये कार्यरत** असलेल्या उमेदवारास वयाची अट नाही.

ब) उप अग्निशमन केंद्र अधिकारी या पदासाठी शासकिय / **निमशासकिय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत** असणाऱ्या उमेदवारास वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

क) शासन आदेशानुसार माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

२. <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :- या जाहिरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये स्वाक्षरीसह अर्ज भरुन त्यासोबत वयाचा दाखला, शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्र, अनुभवाचा दाखला तसेच सक्षम प्राधिका-याचा अधिवास दाखला यांच्या सांक्षाकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जांत नमुद विहित ठिकाणी अलिकडील काळातील उमेदवाराचा फोटो (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५ से.मी) चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करावी.

३. अर्जा सोबत मागासवर्गातील उमेदावारांनी रक्कम रु.१५०/- व अमागास/ खुल्या प्रवर्गातील उमेदवारानी रक्कम रु.३००/- चा " आयुक्त" वसई विरार शहर महानगरपालिका , विरार (पु.) या नांवाचा राष्ट्रियकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) जोडणे आवश्यक आहे. ( धनादेश ग्राह्य धरला जाणार नाही.)

४. <u>उमेदवार निवडण्याची पध्दत</u>

**अ.** शारिरीक क्षमता चाचणी : - विहीत मुदतीत अग्निशमन विभागा अंतर्गत पदांसाठी प्राप्त वैध अर्जदाराची प्रथम शारिरीक क्षमता चाचणी परिक्षा ( उदा. दोरीवर ( रोप) चढणे, ८०० मीटर धावणे, फायरमन लिफ्ट, पोहणे इ.) घेण्यात येईल व शारिरीक क्षमतेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांना लेखी परिक्षेत प्रवेश देण्यात येईल.

**ब .** लेखी परिक्षा : - अग्नीशमन केंद्र अधिकारी व उप-अग्नीशमन केंद्र अधिकारी या पदासाठी लेखी परिक्षेचा तपशिल पुढील प्रमाणे असेल. पदाशी संबंधित विषयावरील प्रश्नांवर १०० मार्कांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परिक्षा घेण्यात येईल त्याचा अवधी दीड तासाची राहील.

५. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर येथे नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत अर्जासोबत सादर करावी.

६. सर्व पदांकरिता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे

७. परिविक्षा कालावधी एक वर्षाचा राहील विभागीय परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर व परिविक्षा कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच सेवेत नियमित केले जाईल.

८. निवड झाल्यास नियमाप्रमाणे शारीरिकदृष्टया काम करण्यास सक्षम असल्याचे सक्षम वैदयकिय अधिका-याचे प्रमाणपत्र दिलेल्या मुदतीत सादर करावे लागेल.

९. फक्त याच जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे या पूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१०. उमेदवारास एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास पदनिहाय स्वतंत्र अर्ज वैयक्तिक माहितीसह (Bio-Data) व त्यासोबत शैक्षणिक पात्रता व इतर नमुद कागदपत्रांच्या सत्यप्रती विहीत नमुन्यासोबत जोडणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेले/ अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत

११. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना आणि सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

१२. सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र. बीसीसी/२००९/प्र.क्र./२९१/०९/१६ब,दि. ०५/११/२००९ नुसार मागासवर्गीच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना त्याचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१३. शासकीय/निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फोजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधिची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१४. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडुन दिलेल्या मुदतीत सादर करावे लागेल.

१५. विविध पदांसाठी विहित केलेली अनुभवाची अर्हता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास नमुद केलेली अनुभवाची अट शिथिल करण्याबाबत विचार करण्यात येईल. व त्याबाबतचे अधिकार आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिकेने राखून ठेवले आहेत.

१६. जाहिरातीमधील नमुद पदसंख्या कमी अथवा अधिक तसेच कोणतीही भरती पदे रद्द करण्यांचे अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

१७. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना आहेत

**सोबतच्या नमुन्यांतील अर्ज परिपूर्ण भरुन दिनांक. १०/५/२०१६ पुर्वी आयुक्त,वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, विरार विरार पूर्व,ता.वसई,जि.पालघर ,पिन ४०१ ३०५ या पत्त्यावर मिळतील अशा पध्दतीने पाठवावेत.**
अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही.लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज करण्यांत येत आहे त्या पदाचा स्पष्ट उल्लेख करावा.

विषेश सुचना :-

१. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

२. मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासुन सावध रहावे

ठिकाण :- विरार
दिनांक :- ०५/०४/२०१६

**सही/-**
**उप-आयुक्त (आस्था.)**
**वसई - विरार शहर महानगरपालिका**